आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१६  मार्च २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची तेलंगणात नगरकुर्नूल इथं विजयसंकल्प सभा

- केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेत निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार /पत्रकार परिषदेचं होणार थेट प्रसारण

- निवडणूक रोखे पद्धत पूर्णपणे बंद करण्याऐवजी त्यामध्ये काही सुधारणा केली जाऊ शकते, असं  केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- प्रसारभारतीचे अध्यक्ष म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतले माजी अधिकारी नवनीत कुमार सेहगल यांनी आज पदभार स्विकारला.

- रेल्वेच्या होळीनिमित्त १२४ जादा गाड्या

- लक्ष्य सेन ची ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक

**आणि**

- महिला प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना उद्या रॉयल चॅलेजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्समधे रंगणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  दक्षिणभारत  दौऱ्याअंतर्गत आज तेलंगणात आहेत. तेलंगणमधे नगरकुर्नूल इथं त्यांनी आज विजय संकल्प सभेत नागरिकांना संबोधित केलं. तेलंगण दक्षिण भारताचं प्रवेशद्वार असून या राज्याच्या विकासाला आपल्या सरकारने नेहमीच प्राधान्य दिलं असल्याचं त्यांनी या सभेत सांगितलं. तेलंगणावासियांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपण तत्पर आहोत, मात्र

त्या आपल्यापर्यंत पोहोचाव्या यासाठी भाजपाचे अधिकाधिक प्रतिनिधी निवडून द्यावे असं आवाहन त्यांनी केलं. आपल्या राजवटीत भ्रष्टाचाराला थारा नसेल असं आश्वासनही दिलं.  प्रधानमंत्री मोदी आज कर्नाटकात कलबुर्गी इथं जाहीर सभा घेणार असून त्यादृष्टीने स्थानिक प्रशासनाने बंदोबस्त केला आहे.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणूकीचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोग आज जाहीर करणार आहे. नवी दिल्ली इथं दुपारी ३ वाजता पत्रकारपरिषदेत ओदिशा, सिक्किम, आंध्रप्रदेश आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर होईल. त्यानंतर लगेचच निवडणूक आचारसंहिता लागू होईल. या पत्रकारपरिषदेचं थेट प्रसारण आकाशवाणीवरुन होणार आहे. त्यामुळे दुपारी ३ वाजता मुंबई केंद्रावरुन प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज दोन वाजून ५५ मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><><>**

निवडणूक रोखे पद्धतीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा आपण आदर करतो परंतु ही पद्धत पूर्णपणे बंद करण्याऐवजी त्यामध्ये काही सुधारणा केली जाऊ शकते, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं माध्यम समूहाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात काल ते  बोलत होते.भारतीय राजकारणामध्ये काळ्या पैश्याचा वापर कमी करण्यासाठी निवडणूक रोखे पद्धत सुरु करण्यात आली, असं ते म्हणाले.  २० हजार कोटी रुपयांच्या निवडणूक रोख्यांपैकी भारतीय जनता पक्षाला जवळपास ६ हजार कोटी रुपये मिळाले. तर मग बाकीचे १४ हजार कोटी रुपयांचे रोखे कुठे गेले असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

देशात सतत होणाऱ्या निवडणुका होत राहिल्या तर त्यातच नागरिक आणि यंत्रणा गुंतून राहतात. सतत होणार्या निवडणुकांमुळे पैसाही बऱ्याच प्रमाणात खर्च होतो. आचारसंहितेमुळे सुरु असलेली विकास कामं थांबतात. हे सर्व थांबण्यासाठी एक राष्ट्र एक निवडणूक हा पर्याय योग्य असल्याचंही शहा म्हणाले.

**<><><><>**

पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेअंतर्गत एक कोटीहून अधिक कुटुंबांची नोंदणी झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. देशाच्या सर्व भागातून यासाठी नोंदणी होत असून आसाम, बिहार, गुजरात, महाराष्ट्र, ओडिशा, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशमध्ये पाच लाखांहून अधिक नोंदणी झाली असल्याचं त्यांनी समाज माध्यम संदेशात म्हटलं आहे. ही योजना ऊर्जा उत्पादन वाढण्यासोबतच घरांसाठीच्या वीज खर्चात लक्षणीय घट नोंदवेल तसंच हा उपक्रम पर्यावरणपूरक जीवनशैलीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देईल असही त्यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी अधिकाअधिक लोकांना लवकर नोंदणी करण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><>**

लष्करी प्रशिक्षण काळात वैद्यकीय कारणांमुळे अपात्र ठरलेल्या सैनिकी उमेदवारांना पुन्हा सेवेत घेण्याच्या प्रस्तावाला आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना मंजुरी दिली आहे. अशा उमेदवाराच्या पालकांकडून गेल्या अनेक वर्षांपासून त्यांना सेवेत सामावून घेण्याची मागणी करण्यात येत होती. अधिकाधिक लष्करी अधिकाऱ्यांची भरती करण्याच्या उद्देशाने दरवर्षी अशा उमेदवारांना लष्करी प्रशिक्षण दिलं जातं. वैद्यकिय आधारावर अपात्र ठरवलेल्या ५०० उमेदवारांना त्याचा लाभ मिळणार आहे.

**<><><><>**

केंद्रसरकारनं जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंट- यासिन मलिक गट या संघटनेला बेकायदेशीर घोषित केलं आहे. ही संघटना तसंच जम्मू काश्मीर पिपल्स फ्रीडम लीग या दोन्ही संघटनांवर पाच वर्षांसाठी बंदी घातल्याची माहिती केंद्रीय गृृहमंत्री अमित शाह यांनी त्यांच्या समाजमाध्यमावरच्या संदेशातून दिली. जम्मू काश्मिरला देशापासून तोडण्यासाठीच्या दहशतवादी कृत्यांमध्ये सामिल असणाऱ्या तसंच देशाचं सार्वभौमत्व, सुरक्षा आणि एकतेला बाधा आणणाऱ्यांना जरब बसेल असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

प्रसारभारतीचे अध्यक्ष म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतले माजी अधिकारी नवनीत कुमार सेहगल यांनी आज पदभार स्विकारला. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या नेतृत्वाखालच्या निवडसमितीच्या शिफारसीनंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांची नेमणूक केली. सेहगल हे १९८८ च्या तुकडीतले उत्तरप्रदेश केडरचे माजी अधिकारी आहेत. प्रसारभारतीचे याआधीचे अध्यक्ष सूर्यप्रकाश हे २०२० ला कार्यकाळ संपल्याने निवृत झाले होते.

<><><><><>

भारतीय रेल्वे उत्तरेकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी होळीनिमित्त ११२ विशेष गाड्या सोडणार असून त्यात मुंबई पुण्याहून अधिक १२ गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. २१ मार्चपासून ते २ एप्रिलपर्यंत या गाड्या उपलब्ध आहेत. मुंबई हून दानापूर, गोरखपूर, पुणे - दानापूर, पुणे गोरखपूर, पनवेल -छपरा -पनवेल अशा काही विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत. विशेष शुल्कासह त्याचे आगाऊ आरक्षण आजपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि आयआरसीटीच्या संकेतस्थळावर सुरु होईल. याचबरोबर गोरखपूर ते महबूबनगर, छपरा सिंकदराबाद या गाड्यांचा लाभ नागपूर आणि बल्लारशाह येथील प्रवाशांना होणार आहे. याची

चौकशी रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावर करता येणार असून प्रवाशांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन रेल्वेनं केलं आहे.

<><><><>

कोणत्याही प्रकारच्या  धर्माधारित द्वेषभावनेचा भारत निषेध करतो असं संयुक्त राष्ट्रामधल्या भारताच्या स्थायी प्रतिनिधी रुचिरा कुंभोज यांनी म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेत धर्मांधारित गटबाजीला भारताचा विरोध असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत “इस्लामोफोबियाविरोधी उपाययोजना” यावरील धोरणासंबधीच्या चर्चेत त्या बोलत होत्या. या धोरणाच्या स्विकारातून भविष्यात एखाद्या धर्माला केंद्रस्थानी ठेवून धोरणे आखली जाण्याचा धोका संभवतो असं त्या म्हणाल्या. आचरणातल्या विविधतेचा भारताला अभिमान आहे आणि सर्व धर्म पंथाच्या लोकांना समान संरक्षण मिळावं ही भारताची भूमिका आहे असं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

आंतराराष्ट्रीय शालेय विद्यार्थ्यांप्रमाणे  राज्यातल्या सर्व शिक्षकांना विशेष गणवेश अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी काल दिली. यापुढे सर्व शिक्षकांना आता त्यांच्या नावापुढे टीआर म्हणजे शिक्षक अशी पदवी लावता येणार असून यातून या व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा मानस असल्याचं केसरकरांनी सांगितलं.

<><><><>

भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन नं ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरूष एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. लक्ष्य सेन जागतिक क्रमवारीत १८ व्या स्थानी आहे. त्यानं जागतिक क्रमवारीत १० व्या क्रमांकावर असलेल्या मलेशियाच्या ली झी जिया याचा २०-२२, २१-१९, २१-१९ असा

पराभव केला. ७१ मिनिटे चाललेल्या कालच्या सामन्यात लक्ष्य ने पहिला गेम २०-२२ ने गमावल्यानंतर पुढच्या दोन्ही सेट मध्ये मात्र मुसंडी मारली. आज लक्ष्य ची लढत इंडोनेशियाच्या जोनातन ख्रिस्ती शी होईल. भारतीय वेळेनुसार दुपारी साडेतीन वाजता हा सामना होणार आहे.

**<><><><><>**

महिला प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये रॉयल चॅलेजर्स बंगळुरू संघानं काल गतविजेत्या मुंबई इंडियन्सचा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. बंगळुरु संघानं मुंबई इंडियन्सचा पाच धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून १३५ धावा केल्या. मुंबई इंडियन्सला २० षटकांत केवळ १३० धावा करता आल्या.

उद्या अंतिम फेरीत रॉयल चॅलेजर्स बंगळुरू चा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे.

**//<><><><><>//**